**ठळक बातम्या**

- दूरसंचार क्षेत्रात भारतानं साधलेली प्रगती आत्मनिर्भर भारताचं प्रतीक आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांचं मुंबईत आगमन

- हिमाचल प्रदेशात बस अपघातात १५ जणांचा मृत्यू

**आणि**

- ISSF जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेला आजपासून ग्रीसमधे सुरुवात

**<><><><><><>**

दूरसंचार क्षेत्रात भारतानं जी प्रगती साधली आहे, ती आत्मनिर्भर भारताचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत यशोभूमी इथं आजपासून सुरू झालेल्या आशियातल्या सर्वात मोठ्या दूरसंचार मीडिया आणि तंत्रज्ञानविषयक ९ व्या इंडिया मोबाईल काँग्रेस २०२५ चं उद्घाटनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावर्षीच्या कार्यक्रमाची इनव्हेंट टू ट्रान्सफॉर्म ही मध्यवर्ती संकल्पना आहे.

देशात काही वर्षांपूर्वी  टु जी नेटवर्क मिळण्यात अडचणी येत होत्या. परंतु आता बहुतांश भागांत फाईव्ह जी नेटवर्क मिळत आहे. डिजिटल कनेक्टिव्हटी ही प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. इंडिया मोबाइल काँग्रेस हे केवळ मोबाईल आणि टेलिकॉमपुरतं मर्यादित राहिलं नसून आशियातील सर्वात मोठा डिजिटल तंत्रज्ञान मंच म्हणून विकसित झाल्याचं ते म्हणाले.

**बाईट प्रधानमंत्री होल्ड**

डिजीटल क्षेत्रात भारत जगातील इतर देशांच्या तुलनेत आघाडीवर असल्याचं केंद्रीय दूरसंचारमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी सांगितलं. २०१४ मध्ये ६ कोटी इंटरनेट वापरकर्ते होते. आज ही संख्या ९४ कोटींहून अधिक झाली आहे. देशातील ९९ टक्के जिल्हे फाईव्ह जी नेटवर्कनं जोडले गेले असून जगातील २० टक्के मोबाइल वापरकर्ते भारतात असल्याचंही शिंदे यांनी नमूद केलं.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवस मुंबई दौऱ्यावर येत असून त्यांच्या हस्ते आज साडे तीन वाजता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन होईल. डिसेंबरपासून या विमानतळावरून उड्डाणांना सुरुवात होईल. त्यानंतर मुंबई मेट्रो-३च्या आचार्य अत्रे मार्ग ते कफ परेड दरम्यानच्या अखेरच्या टप्प्यातल्या मेट्रो सेवेलाही प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील. यामुळं आरे कॉलनी, बीकेसी, सीएसएमटी, चर्चगेट, मंत्रालय, विधानभवन मेट्रो मार्गिकेनं जोडले जाणार आहेत.

लोकल, मुंबई महानगर परिसरातल्या सर्व मेट्रो, मोनो, बेस्ट तसंच मुंबई महानगर क्षेत्रातल्या सर्व महापालिका क्षेत्रातल्या बस सेवेचं तिकिट एकाच ॲपवरून काढता येणाऱ्या मुंबई वन ॲपचं लोकार्पणही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. विविध मेट्रो, बस, लोकल वगैरेंनी टप्प्याटप्प्याने नागरिकांना प्रवास करायचा असला तरी या सर्व प्रवासासाठी स्वतंत्र तिकिटाऐवजी एकच तिकीट या ॲपद्वारे काढता येईल. आयटीआय आणि तंत्रनिकेतन मधल्या अल्पकालीन अभ्यासक्रमांनाही प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरुवात होईल. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><><>**

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांचं आज मुंबईत आगमन झालं. ते आजपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्टार्मर यांचं छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्वागत केलं. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्टार्मर यांचं समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे स्वागत केलं.

कीर स्टार्मर यांची ही पहिलीच भारत भेट आहे. उद्या ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. तसंच मुंबईत फिनटेक फेस्ट इथं देखील उपस्थित राहणार आहेत. स्टार्मर यांच्यासोबत ब्रिटनमधील व्यापारी प्रतिनिधीमंडळ आहे.

<><><><><><>

शिवसेना पक्षाचं नाव आणि निवडणूक चिन्हासंदर्भात उद्धव ठाकरे यांच्या याचिकेवर आता येत्या १२ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. शिवसेना हे पक्षाचं नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत, उज्जल भूयान आणि एन. के. सिंह यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढच्या जानेवारी महिन्यात होणार असून त्यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी घ्यावी, अशी विनंती ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी ठाकरे यांच्या वतीनं केली. ही विनंती मान्य करून येत्या १२ नोव्हेंबर रोजी सुनावणी घेण्याचं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

<><><><><><>

जम्मू काश्मीरमधल्या रजौरी जिल्ह्यातल्या धार साखरी भागात दहशतवादविरोधी कारवाई आजही सुरू आहे. सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांच्या

एका गटामधे कालपासून गोळीबार सुरू आहे. धार साखरी भागात दहशतवादी असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाल्यानंतर काल सुरक्षा दलांनी शोधमोहीम सुरू केली. आज उधमपूर जिल्ह्यातल्या बसंतगड इथंही शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

<><><><><>

हिमाचल प्रदेशात बिलासपूर जिल्ह्यात बालूघाट इथं काल संध्याकाळी झालेल्या भूस्खलनात खासगी बसला अपघात झाला. या अपघातात १५ जणांचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहेत. एक लहान मुलगा बेपत्ता आहे. अपघात झाल्यानंतर तातडीनं मदतकार्य सुरू करण्यात आलं होतं. अपघातग्रस्त बसमध्ये ३० प्रवासी होते.

राष्ट्रपती दौप्रदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं. अपघातात मृत झालेल्यांच्या कुटुंबियांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीमधून दोन लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये आर्थिक मदतीची घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांनीही या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी काल कतारचा तीन दिवसांचा दौरा पूर्ण केला. या दौऱ्यात द्विपक्षीय आर्थिक भागीदारी आणि व्यापारावर चर्चा झाली. या भेटीत गोयल यांनी कतारचे प्रधानमंत्री आणि परराष्ट्र मंत्री शेख मोहम्मद बिन अब्दुल रहमान अल थानी यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक संबंधांच्या विविध पैलूंचा आढावा घेतला. तसंच, २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याचं आणि मुक्त व्यापार करारासाठी वाटाघाटी सुरू करण्याचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यावर सहमती दर्शवली. दोन्ही नेत्यांनी कतार चेंबर आणि फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री

यांच्या सह-अध्यक्षतेखाली असलेल्या संयुक्त व्यवसाय परिषदेच्या उद्घाटन बैठकीलाही संबोधित केलं.

**<><><><><>**

भारतीय हवाई दलाचा ९३ वा स्थापना दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज हवाई दलाचे जवान आणि त्यांच्या कुुटंबीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रपतींनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात हवाई दलाच्या जवानांच्या शौर्याचं कौतुक केलं. तर शौर्य आणि शिस्तीचं प्रदर्शन करत हवाई दल अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही देशाचं रक्षण करतं असे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात काढले. सर्व देशवासियांना जवानांचा अभिमान आहे, असंही प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी लोकनायक जयप्रकाश नारायण यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. आपलं संपूर्ण आयुष्य लोकशाही आणि न्यायासाठी समर्पित करणारे जयप्रकाश नारायण हे द्रष्टे नेते होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, असं राधाकृष्णन यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. आणीबाणीच्या काळात जयप्रकाश नारायण यांनी दिलेल्या योगदानाचं स्मरणही राधाकृष्णन यांनी या संदेशात केलं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या वैष्णव देवी यात्रेला आज पुन्हा सुरुवात झाली. खराब हवामानामुळे ही यात्रा तीन दिवस स्थगित करण्यात आली होती. हवामान स्वच्छ झाल्यानंतर भाविकांसाठी मार्ग खुले करण्यात आले आहेत. यात्रा सुरळीत सुरू

झाली असून भाविकांना गुंफेकडे जाण्याची परवानगी दिल्याचं प्रशासनानं सांगितलं आहे.

<><><><><><>

गाझामधील संघर्ष थांबवण्यासाठीच्या वाटाघाटीत आज कतार आणि तुर्किएचे राजनैतिक अधिकारी सहभागी होणार आहेत. इजिप्तमधे या वाटाघाटी सुरू आहेत. अमेरिकेने ठेवलेल्या वीस कलमी प्रस्तावावर यात चर्चा होणार आहे. इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्दुल फतेह अल सीसी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉं यांच्यात काल संघर्ष थांबवण्याबाबत चर्चा झाली.

<><><><><><>

ISSF जागतिक नेमबाजी अजिंक्यपद - २०२५ स्पर्धा आजपासून ग्रीसमध्ये अथेन्स इथं सुरू होत आहे. या स्पर्धेत भारताचे १२ खेळाडू सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत ६८ देशांतले ४०० पेक्षा जास्त नेमबाज सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतील विजेते खेळाडू वर्षाअखेरीस दोहा इथं होणाऱ्या ISSF जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सहभागी होतील.

//<><><><><><>//